# विद्यापीठ जिल्ह्यात राबविणावर स्वच्छता मोहीम

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती; १५ ऑगस्टपासून मोहिमेला सुरुवात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे ध्वज वंदन झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी कोल्हापूर शहर स्वच्छतेची व्यापक मोहीम हाती घ्यावी. तसेच पुढील टप्प्यात जिल्हा परिषदेच्या प्राधान्यक्रमानुसार स्थानिक तसेच अन्य विद्यापीठांतील एनएसएस स्वयंसेवकांच्या चमूंनी जिल्ह्यातील विविध आपत्तीग्रस्त गावांत नियोजनबद्ध पद्धतीने जाऊन स्वच्छता मोहीम राबवावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत उद्‌भवलेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबविण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यासाठी जिल्ह्यातील कार्यक्रम अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कार्यक्रम अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय येवा योजनेचे 'सेवा' हे ब्रीद



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

लक्षात घेऊन संपूर्ण मोहिमेचे नियोजन करावे. तत्पूर्वी, बुधवारी (दि. १४) शहरातील पूरबाधित विभागांची जागेवर जाऊन पाहणी करावी. त्यातून त्या ठिकाणी लागणारे मनुष्यबळ, सामग्री आणि शासकीय स्तरावरील सहकार्य यांचा त्यांना अंदाज येईल.

त्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष मोहिमेचे नियोजन करावे. त्यातही स्वच्छतेचे स्वरूप प्रथम ठरवावे लागेल. हातमोजे, गमबूट, मास्क इत्यादी साहित्य आवश्यक आहेच, पण, त्याशिवाय शासकीय यंत्रणेस कुठे सहकार्य लागेल, या संदर्भात त्यांनाही आधीच अवगत करा.

स्वच्छता मोहीम राबवित असताना शासकीय यंत्रणेशी समन्वय राखूनच काम करावे. प्रत्येक महाविद्यालयाने आपापल्या शेजारच्या आपत्तीग्रस्त विभागात स्वच्छता मोहीम राबवावी. त्याचप्रमाणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासही सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

नागरिकांनी यापुढील काळात काही वस्तूरुपी मदत द्यावयाची असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राकडे जमा कराव्यात, त्याचप्रमाणे आर्थिक स्वरुपातील मदत ही मुख्यमंत्री सहायता निधीकडेच सुपूर्द करावी, असे आवाहनही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या संपूर्ण क्षमतेचा आढावा घेतला. विद्यापीठाचे एनएसएसचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वच्छता अभियान सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध रितीने राबवावे, असे आवाहन केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात 'ई-बिझनेस' डिप्लोमा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. अधिविभागामध्ये पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस हा एक वर्ष कालावधीमधील डिप्लोमा कोर्स सुरू करण्यात आला आहे; त्यासाठीची प्रवेशप्रक्रिया सुरु झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारतीमधून प्रवेश अर्ज घेऊन विद्यार्थ्यांनी भरावयाचे आहेत.

पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस या कोर्सला कोणत्याही बिषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसायिक, गृहिणी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. या अभ्यासक्रमाच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एम. बी. ए. अधिविभाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन एम. बी. ए. अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 AUG 2019
पुढारी

# शहर-जिल्ह्यात १५ ऑगस्टपासून व्यापक स्वच्छता मोहीम राबणार

## शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार; कुलगुरू डॉ. शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहर-जिल्ह्यात १५ ऑगस्टपासून व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) स्वयंसेवक कोल्हापूर शहर स्वच्छतेची व्यापक मोहीम हाती घेणार आहेत. पुढील टप्प्यात जिल्हा परिषदेच्या प्राधान्यक्रमानुसार स्थानिक व जिल्ह्यातील विविध आपत्तीग्रस्त गावांत नियोजनबद्ध पद्धतीने स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत उद्‌भवलेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबविण्याच्या अनुषंगाने नियोजनासाठी जिल्ह्यातील कार्यक्रम अधिकाऱ्यांची बैठक मंगळवारी झाली. दि. १४ पासून शहरातील पूरबाधित विभागांची पाहणी करावी. त्या ठिकाणी लागणारे मनुष्यबळ, सामग्री व शासकीय स्तरावरील सहकार्य याचा अंदाज घेऊन प्रत्यक्ष मोहिमेचे नियोजन करावे. स्वच्छता मोहीम राबविताना यंत्रणेशी समन्वय राखून काम करावे. प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या भागातील आपत्तीग्रस्त विभागात स्वच्छता मोहीम राबवावी. विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या क्षमतेचा आढावा घेतला. एनएसएसचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी, स्वच्छता अभियान सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध रीतीने राबवावे, असे आवाहन केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित जिल्ह्यातील 'एनएसएस' कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

### आपत्ती निवारण केंद्रातर्फे मदत

महापूर आपत्तीच्या काळात विद्यापीठाने सहा दिवस विद्यापीठात आपत्ती निवारण केंद्र चालविले. तीनशेहून अधिक बाधित नागरिकांना आसरा देण्यात आला. बसस्थानकावर अडकून पडलेल्या पूरग्रस्तांची सर्व प्रकारची सोय करण्यात आली. अनेक ठिकाणी लोकांना अन्नपदार्थ पाठविण्यात आले. विद्यापीठाच्या कॅम्पसवरील गवत पाठवून जनावरांसाठी चारा-वैरणीची व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यापीठाने शहरातील नागरिकांची दररोज सुमारे दोन लाख लिटर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

# विद्यापीठाने दिला मदतीचा हात

## दोन लाख लिटर पाणी, ३० ट्रॉली चारा; २०० ग्रामस्थांना दिला निवारा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने पूरग्रस्तांना मदत करत आपला खारीचा वाटा उचलला. विद्यापीठातर्फे या काळात दोन लाख लिटर पाणी, ३० ट्रॉली चारा देण्यात आला. तर दोनशे पूरग्रस्तांची राहण्याची सोयही विद्यापीठातर्फे करण्यात आली.



महापुराच्या आपत्तीमध्ये व्यक्ती, संस्था, संघटना, राजकीय पक्ष, राजकीय नेते आदींनी आपापल्या परीने पूरग्रस्तांना शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाने मागे न राहता आवश्यक ती सर्व मदत करण्याचा प्रयत्न केला. या काळात शुद्ध पिण्याच्या पाण्याचे मोठा तुटवडा शहर आणि परिसरात निर्माण झाला आहे, तर दुसऱ्या बाजूला शिवाजी विद्यापीठ हे जलयुक्त विद्यापीठ म्हणून जगभर ओळखले जाते. त्यामुळे दोन लाख लिटर पाणी शिवाजी विद्यापीठातर्फे मोफत देण्यात आले.

त्याचबरोबर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर आहे. यावेळी विद्यापीठ परिसरातील ३० ट्रॉली चारा जनावरांसाठी देण्यात आला. शिवाजी विद्यापीठामध्ये पूरबाधित लोकांची राहण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. विद्यापीठात दोनशे पूरबाधित वास्तव्यास होते. या सामाजिक संस्थांच्या मदतीने या सर्वांच्या अन्नाचा प्रश्न मिटविण्यात आला. तर त्यांच्या आरोग्याची काळजी विद्यापीठाच्या प्रशासनातर्फे घेण्यात आली. विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह येथील प्राध्यापक आणि विद्यार्थी, कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.



### स्वच्छता मोहीम राबवणार

पाणी ओसरल्यानंतर रोगराई निर्माण होण्याचा धोका आहे. तो टाळण्यासाठी या परिसरात स्वच्छता मोहीम राबविणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातर्फे कोल्हापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात व्यापक अशी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे चर्चा सुरू असून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या पुढाकाराने एनसीसी, एनएसएस आणि एमएसडब्ल्यूचे स्वयंसेवक या मोहिमेत सहभाग घेणार आहेत.

– **डॉ. व्ही. डी. नांदवडेकर,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ